दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १२७ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.९ मार्च २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# स्मार्ट मीटर बसवल्यास दिवसा वीज बिलावर १०% सवलत

## पाच वर्षांत वीज दर २४ टक्के घटणार–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई (वृत्तसंस्था)**–स्मार्ट मीटर बसवणाऱ्या ग्राहकांना दिवसातील वीज वापरावर १० टक्के सवलत देण्यात येणार आहे. तसेच आगामी पाच वर्षांत वीज दर २४ टक्क्यांनी कमी होतील,अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानसभेत केली. राज्यपालांच्या अभिभाषणाला उत्तर देताना ते बोलत होते. राज्यातील ७० टक्के घरगुती ग्राहक (सुमारे १.५ कोटी कुटुंबे) हे दरमहा ० ते १०० युनिट वीज वापरतात. त्यांच्यासाठी नवीन योजना आणली जाईल. याद्वारे ते घरावर सोलार पॅनल बसवून पूर्णपणे वीज बिलमुक्त होतील, असे ते म्हणाले.फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र सरकारने 'सूर्यघर मोफत वीज योजना' प्रभावीपणे राबवून देशभरात पहिल्या क्रमांकावर झेप घेतली आहे. या योजनेअंतर्गत ३०० युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळणार असून त्यांनी जादा वीजनिर्मिती केल्यास ती सरकार खरेदी करेल. त्यामुळे ग्राहकांना वीज बिलाच्या चिंतेतून मुक्ती मिळेल. सरकारने बहुवार्षिक वीज दर याचिका सादर करत वीज दरात कपातीचा निर्णय घेतला. जी वीज ८ रुपयांना पडत होती ती केवळ ३ रुपयांना पडणार आहे, युनिटमागे ५ रुपये आपण वाचवत आहोत. याचा ७० टक्के ग्राहकांना थेट फायदा होणार असल्याचे फडणवीस म्हणाले.




घरगुती वीज ग्राहकांसाठी मोठा दिलासा : राज्यात १०० ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी दर १७ टक्क्यांनी कमी केले जात आहेत. यामुळे ९५ टक्के घरगुती ग्राहकांना वीज दर कपातीचा थेट लाभ मिळेल. स्मार्ट मीटर बसवले तर दिवसा वापरलेल्या विजेवर १० टक्के सवलत मिळेल. मुख्यमंत्री कृषी वाहिनी प्रकल्पाअंतर्गत २०२६ पर्यंत शेतकऱ्यांना संपूर्ण सौरऊर्जेवर आधारित वीजपुरवठा केला जाणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना ३६५ दिवस वीज उपलब्ध होईल.दावोसमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक १५ लाख ७० हजार कोटींचे गुंतवणूक ५४ करार केले आहेत. या करारांमधून प्रत्यक्ष उत्पादन सुरू होण्याचे प्रमाण ८० ते ९१ टक्के आहे. गुजरात, कर्नाटक आणि दिल्ली यांच्या तुलनेत तीन पट अधिक गुंतवणूक या वर्षीच्या आर्थिक परिषदेत महाराष्ट्राने मिळवली आहे. या गुंतवणूक करारामध्ये स्टील, पायाभूत सुविधा, सिमेंट, लिथियम बॅटरी, सोलार, डेटा सेंटर आणि रिअल इस्टेट कंपन्यांच्या समावेश आहे.

### कारागृह विभागात ५०० कोटींचा घोटाळा

## कारागृहातील घोटाळ्याच्या चौकशीसाठी मुख्यमंत्र्यांनी चौकशी समिती नेमावे- माजी खासदार राजू शेट्टी

**पुणे (वृत्तसंस्था)**– राज्यातील कारागृहामध्ये सन २०२३ ते २०२५ या वर्षांमध्ये रेशन , कँन्टीन व विद्युत उपकरणांच्या खरेदीमध्ये जवळपास ५०० कोटी रूपयाहून अधिक रक्कमेचा घोटाळा झाला नसल्याचा व माझ्या काळातील खरेदी नसल्याचे स्पष्टीकरण तत्कालीन अप्पर पोलिस महासंचालक अमिताभ गुप्ता यांनी हे धांदात खोटे आहे. अमिताभ गुप्ता हे डिसेंबर २०२२ ते जुलै २०२४ या काळात अप्पर पोलिस महासंचालक कारागृह विभाग पुणे येथे कार्यरत होते. अमिताभ गुप्ता यांच्याच काळात कारागृहात अनेक उपकरणांचे खरेदी झाली असून त्यामधील घोटाळ्याची चौकशी पुर्ण करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी चौकशी समिती नेमण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी केली. राज्यातील कारागृहातील घोटाळ्याबाबत काल झालेल्या पत्रकार परिषदेनंतर तत्कालीन अप्पर पोलिस महासंचालक अमिताभ गुप्ता माझ्या काळातील खरेदी झाले नसल्याचे तर पोलिस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांनी शासनाच्या नियमानुसार खरेदी झाले असल्याचा खुलासा केला आहे. दोन्ही अधिका–यांनी सारवासारव केली असून याबाबत सर्व पुराव्यानिशी माहिती काल पत्रकार परिषदेत दिली असल्याचे शेट्टी यांनी सांगितले. अमिताभ गुप्ता यांनी त्यांच्या काळात अनेक उपकरणे खरेदी केली आहेत. सदरची खरेदी जीएम वरून करत असताना त्या वस्तूंचा त्यावेळचा बाजारातील दर व कारागृह विभागाने




खरेदी केलेले दरामध्ये मोठी तफावत आहे. उदा, ३० केव्ही जनरेटरची बाजारातील किंमत ५ लाख ४० हजार असताना कारागृहाने ९ लाख ९० हजार रूपयास खरेदी केली आहे. क्ष्ज्ञ चे लेसर प्रिंटर ३० हजाराची बाजारात किंमत असून ४९ हजार २२० रूपयांनी खरेदी केली आहे. अमिताभ गुप्ता यांनीच काही मर्जीतल्या ठेकेदारामार्फत खरेदी करता यावा याकरिता २७ मार्च २०२४ रोजी केंद्रीय पध्दतीने निवीदा करण्याची मागणी शासनाकडे मागणी केली होती.यामुळे सदरच्या भ्रष्टाचाराची चौकशी सखोल होण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी तातडीने चौकशी समिती नेमण्याची गरज असून याबाबत पुढील आठवड्यात मुख्यमंत्री , मुख्य सचिव व गृह सचिव यांना भेटून सदरची चौकशी समिती नेमण्याची मागणी करणार आहे.जर खरोखरच कारागृह विभागात भ्रष्टाचार झाला नसेल तर दोन्ही अधिकारी जी वेळ देतील तेंव्हा माध्यमांच्यासमोर त्यावेळचे कारागृहाने खरेदी केलेले दर व त्या वस्तुंचे त्याकाळातील बाजारातील दरपत्रक पुन्हा एकदा सादर करणार असल्याचे शेट्टी यांनी सांगितले.

### महाराष्ट्रात तापमानाचा भडका उडणार?

## पुढील तीन ते चार दिवसांत उष्णता जाणवणार

**मुंबई (वृत्तसंस्था)**–आता देशातील हवामान बदलणार आहे. येत्या दोन दिवसांत महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेशसह देशातील ९ राज्यांमध्ये उष्णता वेगाने वाढेल. खासगी हवामान एजन्सी स्कायमेटच्या मते, अफगाणिस्तानवर वेस्टर्न डिस्टर्बन्स सक्रिय आहे. ते ९ मार्चच्या रात्री जम्मू आणि काश्मीरला पोहोचेल. महाराष्ट्रात उत्तरेऐवजी पूर्वेकडून वारे वाहू लागतील. यामुळे पुढील तीन–चार दिवसांत खूप उष्णता जाणवेल. १०–११ मार्च रोजी मध्य महाराष्ट्रात उष्णतेची लाट येऊ शकते, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

हवामान एजन्सीच्या मते, यानंतरही सलग दोन–तीन पश्चिमी डिस्टर्बन्स निर्माण होतील. त्यांच्यात फरक नसल्याने, उत्तरेकडील वारे वाहू शकणार नाहीत आणि थंडी संपेल. यामुळे १५–१६ मार्चपर्यंत तापमान जास्त राहील. दरम्यान, रात्रीचे



तापमानही वाढेल आणि सकाळ आणि रात्रीची थंडी संपेल. पश्चिमी विक्षोभामुळे बहुतेक डोंगराळ भागातील राज्यांवर परिणाम होईल.ज्येष्ठ हवामान तज्ञ डॉ. वेद प्रकाश सिंह म्हणाले की, होळीच्या दिवशी (१३–१४ मार्च) मध्य प्रदेशातील बहुतेक भागात दिवसाचे तापमान ३५ ते ३६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू शकते. तर रात्रीचे तापमान १७–१८ अंशांच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. १६ किंवा १७ मार्चपासून राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण आणि पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## महिलांना एक खून माफ करा:रोहिणी खडसे यांची राष्ट्रपतींकडे मागणी

### महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या घटनांचा दिला दाखला

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महिलांवरील वाढत्या अत्याचारांच्या घटनांमुळे महिलांना एक खून माफ करण्याची मागणी शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्याकडे केली आहे.



दरम्यान, रोहिणी खडसे पुढे बोलताना म्हणाल्या की, आपला देश हा महात्मा बुद्ध आणि महात्मा गांधींचा देश म्हणून ओळखला जातो. जे शांतीचे अहिंसेचे मोठे प्रतीक आहे. तरी आपली क्षमा मागून वरील मागणी करत आहे. सध्या सगळीकडे याच पत्राची चर्चा सुरू आहे.सर्वात प्रथम आपल्याला जागतिक महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा ! आपला देश हा महात्मा बुद्ध आणि महात्मा गांधींचा देश म्हणून ओळखला जातो. जे शांतीचे अहिंसेचे मोठे प्रतीक आहे तरी आपली क्षमा मागून वरील मागणी करत आहे. कारणही तसेच आहे. आज देशात महिला मोठ्या प्रमाणात असुरक्षित आहेत. येणाऱ्या प्रत्येक दिवशी महिलांवरील अत्याचारांच्या घटनेत वाढ होत आहे. दोनच दिवसांपूर्वी पूर्वी देशाची आर्थिक राजधानी मुंबई येथे एका १२ वर्षीय मुलीवर सामूहिक अत्याचार करण्यात आले. राष्ट्रपती महोदया, १२ वर्षीय ! विचार करा काय परिस्थिती असेल? नुकताच वर्ल्ड पॉपुलेशन रिव्यू सर्व्हे आला आहे अशा बातम्या आम्ही वाचल्या. या सर्व्हेमध्ये महिलांसाठी असुरक्षित असलेल्या जगातील विविध देशांचा उल्लेख केला आहे. या सर्व्हे नुसार आशिया खंडात भारत सर्वात असुरक्षित देश असल्याचे म्हटले गेले आहे. महिलांचे अपहरण, महिला बेपत्ता होण्याचे प्रकार, घरगुती हिंसाचार आणि अन्य गंभीर विषयांचाही समावेश आहे त्यामुळे आम्हाला एक खून माफ करा, अशी आम्ही समस्त महिलांच्या वतीने मागणी करतो.

### लाडक्या बहिणींची शासनाकडून फसवणूक

## रत्नागिरी जिल्ह्यातील बहिणींना फक्त एकाच महिन्याचा हप्ता मिळाला

**मुंबई (वृत्तसंस्था)**– 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा फक्त फेब्रुवारी महिन्याचा हप्ता देवून राज्य शासनाने लाडक्या बहिणींची घोर निराशा केली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील सुमारे ४ लाख १७ हजार लाडक्या बहीणी असून त्यातील काहीच बहिणींना फेब्रुवारीचा हप्ता आला आला आहे. इतर बहिणी आजही खात्यात हप्ता येण्याच्या प्रतिक्षेत आहेत. महिला दिनीच शासनाकडून आपली फसवणूक झाल्याने लाडक्या बहिणींनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील बहिणींना मागील वर्षातील डिसेंबर व जानेवारीमधील हप्ता हा दोन्ही



महिन्यांच्या अखेरच्या आठवड्यात देण्यात आला होता. त्यामुळे फेब्रुवारी महिन्याचा हप्ताही अशाच प्रकारे महिनाअखेर जमा होईल अशी आशा होती. मात्र फेब्रुवारी महिन्याचा हप्ता जमा न करता तो शनिवार ८ मार्चला फेब्रुवारी व मार्च अशा दोन्ही महिन्यांचा हप्ता एकत्रित जमा करणार असल्याचे महिला व बाळ कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी जाहीर केले होते. यामुळे संपुर्ण राज्यातील लाडक्या बहिणीसह रत्नागिरी जिल्ह्यातील ४ लाख १७ हजार बहिणी या दोन्ही हप्त्यांच्या प्रतिक्षेत होत्या. मात्र त्यांची ऐन जागतिक महिला दिनाच्याच दिवशी राज्य शासनाकडून फसवणूक झाल्याचे समोर आले आहे. या प्रकारामुळे रत्नागिरीतील काही बहिणींनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे.

बुलडाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी, मर्यादित
बुलडाणा रं.नं. २६७ (मल्टिस्टेट)

**जाहीर लिलाव**

बुलडाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी मर्या. बुलडाणा मल्टिस्टेट रं.नं. २६७ विभाग गोंदिया मधील खालील थकबाकीदारांनी सोने / चांदी तारण कर्ज घेतलेल्या कर्जाची परतफेड नियमित न केल्यामुळे त्यांना वारंवार सूचना / नोटीस देण्यात येऊन सुद्धा त्यांनी कर्जभरणा न केल्यामुळे त्यांनी तारण दिलेल्या सोने तारण मालाचा जाहीर लिलाव १९/०३/२०२५ वार बुधवारी ११.०० वाजता संस्थेच्या विभागीय कार्यालय येथे ठेवण्यात आला आहे. तरी इच्छुकांनी लिलावास भाग घेण्याकरिता वेळेवर उपस्थित राहावे.

| शाखा | कर्जदाराचे नाव | कर्जदाराचा पत्ता | तारण मालमत्तेचे वर्णन | शुध्द वजन ग्राम मध्ये | लिलावाचे ठिकाण व वेळ |
|---|---|---|---|---|---|
| गोंदिया | अमोद पूरनलाल लक्षणे | मु. मोहगाव पो. सुपलीपार, ता. आमगाव जि.-गोंदिया | अंगठी | २.०० | विभागीय कार्यालय गोंदिया, सकाळी ११.०० वाजता |
| गोंदिया | अमोद पूरनलाल लक्षणे | मु. मोहगाव पो. सुपलीपार, ता. आमगाव जि.-गोंदिया | टॉप्स-२ | १.५५ | |
| लाखनी | सुभाष अशोक लोखंडे | विठ्ठल रुकमई मंदिर जवळ, लाखनी | गरसुली, टॉप्स | ४.०० | |
| लाखनी | सुभाष अशोक लोखंडे | विठ्ठल रुकमई मंदिर जवळ, लाखनी | २० मनी | १.२०० | |
| लाखनी | सुभाष अशोक लोखंडे | विठ्ठल रुकमई मंदिर जवळ, ता.पो.-लाखनी | टॉप्स | २.४०० | |
| लाखनी | सुभाष अशोक लोखंडे | विठ्ठल रुकमई मंदिर जवळ, लाखनी | पान पोत | ४.०५ | |
| लाखनी | सुभाष अशोक लोखंडे | विठ्ठल रुकमई मंदिर जवळ, लाखनी | गरसुली | २.०० | |

**टिप :-** वरील लिलावाच्या नियम व अटी कार्यालयीन वेळेमध्ये पहावयास मिळतील.

**ठिकाण :-** बुलडाणा अर्बन, विभागीय कार्यालय गोंदिया, एन.एम.डी. कॉलेज रोड, बिसेन पेट्रोल पंप जवळ, कुडवा, गोंदिया.

विभागीय व्यवस्थापक
बुलडाणा अर्बन को-ऑप क्रेडिट सोसा., मर्या. बुलडाणा
रं.नं. २६७ (मल्टिस्टेट), विभाग गोंदिया

## चंद्रपूर पोलिस हत्याकांड: तीन आरोपींना अटक

**चंद्रपूर (वृत्तसंस्था)**–बारमालकाशी बिल देण्यावरून झालेल्या वादात मध्यस्थी करणाऱ्या पोलिस अंमलदारावर चाकूने हल्ला करून हत्या करणाऱ्या तीन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. अटक करण्यात आलेले आरोपी आहेत – अक्षय उर्फ आकाश संजु शिर्के (वय २९), यश अनिल समुंद (वय २७, रा. हनुमान मंदिर जवळ, दादमहल वार्ड, चंद्रपूर) आणि नितेश हनुमान जाधव (वय २९, रा. समाधी वार्ड, चंद्रपूर).

बारमध्ये बिल देण्यावरून नितेश जाधव आणि अक्षय शिर्के यांचा मॅनेजरसोबत वाद झाला. हा वाद सुरू असताना तेथे उपस्थित असलेल्या पोलीस अंमलदार संदीप उर्फ समीर चाफले यांनी मध्यस्थी करत आरोपींना समजावण्याचा प्रयत्न केला. मॅनेजर निघून गेल्यानंतरही आरोपींनी चाफले यांच्यासोबत वाद घातला आणि त्यानंतर यश समुंद याला फोन करून बोलावले.जेव्हा पोलिस अंमलदार संदीप चाफले आणि त्यांच्या सोबतचे पोलीस अंमलदार दिलीप चव्हाण बारच्या बाहेर पडले, तेव्हा आरोपींनी धारदार शस्त्राने त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात पोलीस अंमलदार दिलीप चव्हाण गंभीर जखमी होऊन मृत्युमुखी पडले, तर संदीप चाफले गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.या घटनेनंतर पोलीस स्टेशन चंद्रपूर शहर येथे आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये कलम १०३(१), १०९(१), २९६, ३(५) नुसार खुनाचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.घटनेनंतर पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत आरोपी अक्षय शिर्के, यश समुंद आणि नितेश जाधव यांना अटक केली. पुढील तपास सुरू आहे.



# वाहतूक समस्येकडे दुर्लक्ष; पार्किंग नाही, पण चालान फाडले जातं

### नव्या अधिकाऱ्याचा 'तोडराज'!

७ मार्च रोजी वर्धा शहर ठाण्यात नुकतेच रुजू झालेले पोलिस अधिकारी सवाई रस्त्यावर उतरले आणि आपल्या खाकी वर्दीचा तोरा दाखवू लागले. महाराष्ट्र बँकेसमोर त्यांनी एका दुचाकीस्वाराची चाबी काढण्याचा प्रयत्न केला आणि धमकी दिली. त्यानंतर इंगोले चौक, बढे चौक येथेही चारचाकी वाहनचालकांना अडवून धाक दाखवला.

### ३१ मार्चपूर्वी वसुली मोहीम?

याप्रकरणी नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून, वाहतूक व्यवस्थेतील अनागोंदी सोडवण्याऐवजी फक्त दंडवसुली केली जात असल्याची टीका होत आहे. विशेषतः मार्च महिन्यात मोठ्या प्रमाणावर दंड वसुली केली जाते, त्यामुळे ही मोहीम ३१ मार्चच्या लक्ष्यपूर्तीसाठी तर नाही ना? असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. प्रशासनाने वाहतूक सुधारण्याचे ठोस उपाय न करता केवळ नागरिकांना वेठीस धरण्याचे धोरण बदलावे, अशी मागणी केली जात आहे.



**वर्धा (राहुल मून):**शहर लहान असले तरी वाहतूक अराजक आणि अतिक्रमण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. रस्त्यांवर पार्किंगची सोय नसतानाही वाहनधारकांवर सर्रास चालान फाडले जात आहे. नगरपालिका आणि वाहतूक विभागाकडून कोणतीही ठोस उपाययोजना न करता थेट कारवाईचा बडगा उचलला जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

### वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा

वर्धा शहरातील वाहतूक व्यवस्थेचा पूर्णतः बोजवारा उडाला आहे. आर्वी नाका, शिवाजी चौक, आरती चौक आणि बजाज चौक येथे सिग्नल लावले असले तरी ते कायम बंद असतात. धुनिवाले चौकात तर बेशिस्त ट्रॅव्हल्स पार्किंगमुळे अपघाताची शक्यता कायम असते. गेल्या दीड वर्षांपासून वाहतूक पोलिस तैनात नव्हते, मात्र दबंग अधिकारी संतोष शेगावकर यांनी काही प्रमाणात शिस्त लावण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

### शहरात पार्किंगचा अभाव, पण दंडाची वसुली जोरात

शहरातील बँकांसह कुठेही वाहनतळाची व्यवस्था नाही. नगरपालिकेने देखील कोणतीही अधिकृत पार्किंग जागा निश्चित केलेली नाही. जुन्या नगरपालिकेच्या जागेवर वाहनतळ उभारण्याची चर्चा झाली होती, पण तो प्रकल्प अद्याप हवेतच आहे. अशा परिस्थितीत वाहनधारकांना जागा मिळेल तिथे गाड्या लावण्याशिवाय पर्याय उरत नाही. मात्र, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशावरून वाहतूक पोलिस सर्रास चालान फाडण्याचे काम सुरू करतात.

## अखेर एस एम डब्ल्यू इस्पात कंपनीतील संप मिटला



**देवळी । प्रतिनिधी**

गेल्या चार दिवसापासून एस एम डब्ल्यू इस्पात कं लि च्या कामगारांनी आपल्या मागण्यांसाठी संभाजी ब्रिगेड कामगार संघटना विदर्भ संघटक तुषार उमाळे यांच्या नेतृत्वात काम बंद आंदोलन सुरू केले होते गेल्या चार दिवसापासून बऱ्याच वाटाघाटी झाल्या पण तोडगा निघत नव्हता अखेर काल मंगळवार ला रात्री जिल्हा कामगार अधिकारी सिद्धेश्वर फड व देवळी पोलीस स्टेशन चे ठाणेदार रवींद्र शिंदे यांच्या सफल मध्यस्थीने काल रात्री उशिरा तुषार उमाळे व कामगार यांच्यासोबत चर्चा करून कामगारांच्या सर्व मागण्या कंपनी प्रशासनाने मंजूर करून संपावर तोडगा काढण्यात आला. कामगारांच्या मागण्या पूर्ण झाल्याने कामगारांनी जल्लोष करत एकमेकांना पेढे भरवत शुभेच्छा दिल्या.

## वरोरा शहरात प्रथमच रंगणार राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धा

**वरोरा । प्रतिनिधी**

क्रीडा क्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या व विविध स्पर्धांसाठी चर्चेत राहणाऱ्या आनंद निकेतन महाविद्यालय, वरोरा येथे १० व ११ मार्च २०२५ रोजी राज्यस्तरीय निमंत्रित हँडबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा पुरुष गटात होणार असून, महाराष्ट्रातील १२ अव्वल संघ सहभागी होतील.स्पर्धेचा उद्घाटन समारंभ १० मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता होणार असून, प्रमुख उपस्थितीमध्ये आमदार करण देवतळे, प्राचार्य डॉ. मृणाल काळे, उपप्राचार्य प्रा. राधा सवाने, तसेच जिल्हा हँडबॉल संघटनेचे सचिव प्रकाश तुमाने आणि इतर मान्यवरांचा समावेश आहे.



या स्पर्धेचे आयोजन प्राचार्य डॉ. मृणाल काळे, प्रा. राधा सवाने, प्रा. तानाजी बायस्कर, मयुर भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद निकेतन हँडबॉल क्लबच्या सीनियर खेळाडूंनी केले आहे.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे, विश्वस्त कौस्तुभ आमटे, सौ. पल्लवी आमटे, डॉ. विजय पोळ, विश्वस्त सुधाकर कडू आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.प्रथमच वरोरा शहरात राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धा होत असल्याने नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक मंडळातर्फे करण्यात आले आहे.

## महिला दिनानिमित्त मूल येथे विविध स्पर्धांचे आयोजन

**मूल । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त योग नृत्य परिवाराच्या वतीने दुर्गा मंदिर प्रांगणात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष संतोषसिंह रावत यांच्या मार्गदर्शनाखाली झाले. पहाटे ५.३० वाजता महिला दिनाची सुरुवात 'इतनी शक्ती हमें देना दाता' या गीताने करण्यात आली.महिलांसाठी पायाला दोरी बांधून चालणे, बादलीमध्ये ग्लास टाकणे, इंग्रजी-मराठी फास्ट काउंटिंग यांसारख्या स्पर्धा घेण्यात आल्या. विजेत्यांना कुसुम कापगते आणि प्रभा सोमलकर यांच्या हस्ते भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक लीना जांभूळवार यांनी केले, तर निवृत्त प्राचार्या मिराताई शेंडे आणि निवृत्त प्राचार्य बंडू गुरनूले यांनी महिला दिनाचे महत्त्व स्पष्ट केले.कार्यक्रमाचे संचालन वैशाली बोकारे यांनी तर आभार आरती चेपुरवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रंजना चौधरी, शामला बेलसरे, समता बन्सोड, वैशाली काळे, उमा महावादीवार, संजय पडोळे आदींनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाची सांगता अल्पोपहाराने झाली.

## घरकुल लाभार्थ्यांना शासकीय दरात त्वरित रेती उपलब्ध करून द्या-मुकेश जिवतोडे

**वरोरा । प्रतिनिधी**

भद्रावती तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना दिले निवेदन भद्रावती आणि वरोरा तालुक्यातील घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना घरे बांधण्यासाठी आवश्यक असलेली रेती मिळत नसल्याने अनेक घरकुलांचे काम अर्धवट राहिले आहे. तालुक्यातील रेती घाट बंद असल्यामुळे लाभार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे लोकसभा संघटक मुकेश जिवतोडे यांच्या नेतृत्वाखाली वरोरा आणि भद्रावती तहसीलदार तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांना निवेदन देण्यात आले.



या निवेदनात, घरकुल लाभार्थ्यांना तातडीने रेतीपुरवठा करण्याची मागणी करण्यात आली आहे. शासनाच्या घरकुल योजनेत मंजूर लाभार्थ्यांनी घरांचे बांधकाम सुरू केले आहे, मात्र रेतीच्या टंचाईमुळे घरे अपूर्ण अवस्थेत आहेत. त्यामुळे शासनाने त्वरित उपाययोजना करून लाभार्थ्यांना शासकीय दराने रेती उपलब्ध करून द्यावी, अशी शिवसेनेची ठाम मागणी आहे.यावेळी झालेल्या चर्चेत, वरोरा व भद्रावती तालुक्यातील रेती घाटातून घरकुल लाभार्थ्यांना रेती उपलब्ध करून देण्याची विशेष व्यवस्था करून देण्यात यावी व पर्यायी व्यवस्था करून घरकुल धारकांना दिलासा द्यावा, अशी स्पष्ट भूमिका मांडण्यात आली. प्रशासनाने यावर तातडीने योग्य निर्णय घ्यावा घरकुल धारकांना दिलासा द्यावा अशी मागणी यावेळी करण्यात आली.यावेळी निवेदन देताना उपतालुका प्रमुख मंगेश ढेंगळे, युवासेना माजी उपजिल्हा प्रमुख महेश जिवतोडे, धानोली उपसरपंच ज्ञानेश्वर खापणे,

डोंगरगाव खडी सरपंच मनिषा तुराणकर,उपसरपंच जगदीश चौधरी व असंख्य नागरिक उपस्थित होते.

## केसरीमल नगर विद्यालयाच्या पाच विद्यार्थ्यांना केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालयाची शिष्यवृत्ती

**सिंदी रेल्वे । प्रतिनिधी**

केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालय, नवी दिल्ली यांच्यातर्फे संपूर्ण भारतभर संस्कृत विषयात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. शैक्षणिक सत्र २०२४-२५ करीता घोषित या शिष्यवृत्तीसाठी स्थानिक केसरीमल नगर विद्यालयातील पाच विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. त्यांना वार्षिक पाच हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे.

शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये कु. देवांशी गणेश सोनटक्के, धनंजय गजानन तळवेकर, हिमांशू अंकुशराव भट, नयन चंद्रभान वरघणे आणि नाविन्य कृष्णाजी परांडे यांचा समावेश आहे. मागील वर्षातील गुणांच्या आधारे ही शिष्यवृत्ती दिली जाते. संपूर्ण सेलू तालुक्यात संस्कृत हा विषय शिकवली जाणारी ही एकमेव शाळा आहे.संस्कृत शिक्षक तथा संगीत शिक्षक विलास कोरान्ने यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी यश मिळवले.



विद्यालयाचे प्राचार्य विलास येखंडे, पर्यवेक्षक अनिल चांदेकर, शाळेचे संचालक मंडळ, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

## बुद्धगयाचे महाबोधी बुद्ध विहार चा ताबा बौद्धांना द्या



**देवळी । प्रतिनिधी**

बुद्धगया येतील महाबोधी बुद्ध विहार भारतातच नव्हे तर जगभरात बौद्ध धर्माचे पवित्र स्थान आहे महाबोधी बुद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात देण्याकरिता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती व देवळीतील विविध बुद्ध विहार समित्या कडून ७ मार्च २०२५ ला तहसीलदार देवळी मार्फत महामहीम राष्ट्रपती नवी दिल्ली यांना निवेदन देण्यात आले.

तथागत भगवान गौतम बुद्धाने प्रथम बुद्धगयेस बोधी वृक्षाखाली २५६८ वर्षापूर्वी पंचवर्गीयांना धम्मदीक्षा दिली सम्राट अशोकांनी त्या ठिकाणी महाबोधी बुद्ध विहाराची स्थापना केली त्या ठिकाणी धम्माच्या प्रचार प्रसाराचे कार्य सुरू झाले. बौद्धांच्या ताब्यातील महाबोधी विहार सन १९४९ मध्ये केलेल्या कायद्याचा आधार घेऊन पुजाऱ्यांनी बेकायदेशीर ताबा घेतला. प्रत्येक धर्माचे एक श्रद्धास्थान असते मंदिर, मस्जिद, चर्च, गुरुद्वारा इत्यादी भारत सरकारने भारताचे संविधान २६ जानेवारी १९५० नुसार सर्वांना धर्म निरपेक्ष पद्धतीने स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायाप्रमाणे समान संधी व समान न्यायाची सदाचार व नैतिकतेचे पालन करण्याची संधी दिली आहे या धर्म निरपेक्ष तत्त्वानुसार बौद्धांना बौद्ध पद्धतीने रीतीरीवाज व धम्माचा प्रचार प्रसार करण्याची संधी प्राप्त करून द्यावी ज्या धर्माचे हक्क त्या धर्माला प्राप्त करून द्यावे या मागणी करिता तहसीलदार देवळी मार्फत महामहीम राष्ट्रपती नवी दिल्ली यांना निवेदनातून केली आहे. याप्रसंगी एकनाथ कांबळे, धनराज घुबडे, माझी न प अध्यक्ष गौतम पोपटकर, दादारावजी मून व देवळीतील विविध बुद्ध विहाराचे पदाधिकारी उपस्थित होते.

## सेंट जॉन हायस्कूल येथे जागतिक महिला दिनानिमित्त डिश सजावट व हस्तकला प्रदर्शनी चे आयोजन

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक यशबोध ज्ञान प्रबोधिनी द्वारा संचालित सेंट जॉन प्राथमिक विद्यालय व उच्च प्राथमिक विद्यालय येथे दि. ०८/०३/२०२५ ला जागतिक महिला दिनानिमित्त डिश सजावट व हस्तकला प्रदर्शनी चे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून भारती उंबरकर मॅडम, शाळेचे प्राचार्य श्री. संतोष यादव सर, उप प्राचार्या सौं. आरती कुरझडकर मॅडम उपस्थित होत्या. या मध्ये महिलांनी डिश सजावट व हस्तकला सादर केल्या. या मध्ये महिलांनी विविध



प्रकारचे जसे कि स्थानिक विविध राज्यांचे पारंपरिक व्यंजन व आपल्या संस्कृतीशी निगडित डिश सजावट व स्त्री - शक्ती शी निगडित म्हणून आपली आई, बहीण या आपल्या जिवनात किती अनमोल आहेत यांची हस्तकला सादर करण्यात आली. मुख्य अतिथी व प्राचार्य, उप प्राचार्या यांनी या पारंपरिक डिश सजावट व व्यंजन, हस्तकला यांचे परीक्षण केले व उपस्थित महिलांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या. या मध्ये प्रथम पारितोषिक सौं. मीनाक्षी बावणे, द्वितीय पारितोषिक सौं. शुभांगी माजरखेडे, तृतीय क्रमांक नमीरा परवीन शेख यांना देण्यात आले. शाळेच्या अध्यक्षा सौं. प्रीती बोरसे मॅडम यांनी जागतिक महिला दिनानिमित्य महिलांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन किरण केशरवानी मॅडम तसेंच आभार प्रदर्शन सौं. कविता डेहणकर मॅडम यांनी केले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या दिनाला खूप सहकार्य केले व आपले योगदान दिले.

## वाघाच्या हल्ल्यात मेंढपाळाचा मृत्यू; मूल परिसरात दहशत

**मूल । प्रतिनिधी**

सोमनाथ रोडवरील शेतशिवारात वाघाच्या हल्ल्यात मेंढपाळाचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. मल्लाजी पोचु येग्गावार (वय ५८, रा. कुरमार मोहल्ला, मूल) असे मृतकाचे नाव आहे.ही घटना गणेश कावळे यांच्या शेताजवळ घडली. घटनास्थळी मेंढपाळाचे धड वेगळे डोके आणि धोतर आढळून आले, त्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती वन विभागाला देण्यात आली आहे.



### तालुक्यात दोन दिवसांत दुसरी घटना

**केवळ दोन दिवसांपूर्वी एमआयडीसी परिसरात वाघाने एका मेंढपाळाचा बळी घेतला होता. त्यानंतर पुन्हा दुसऱ्या हल्ल्यामुळे परिसरात संताप आणि दहशत पसरली आहे. वन विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.**

## गुणवंत क्रीडा पुरस्काराला छत्रपती संभाजी महाराजांचे नाव द्यावे-गिरडकर

**ब्रम्हपुरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने दरवर्षी १ मे किंवा २६ जानेवारी रोजी राज्यातील उत्कृष्ट खेळाडू आणि क्रीडा मार्गदर्शकांचा जिल्हा गुणवंत क्रीडा पुरस्काराने सन्मान केला जातो. हा पुरस्कार महाराष्ट्र क्रीडा धोरणांतर्गत खेळाडूंच्या योगदानाचे मूल्यमापन करून दिला जातो.



मात्र, यापुढे या गुणवंत क्रीडा पुरस्काराला 'छत्रपती संभाजीराजे क्रीडा पुरस्कार' असे नाव द्यावे, अशी मागणी हरित सेना सदस्य महेश गिरडकर यांनी केली आहे. त्यांनी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, छत्रपती संभाजी महाराज हे पराक्रमी योद्धा आणि नेतृत्वगुणांनी संपन्न होते. त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासातून खेळाडूंना प्रेरणा आणि ऊर्जा मिळेल, त्यामुळे हा पुरस्कार त्यांच्या नावाने गौरविण्यात यावा.राज्यातील सर्वोच्च 'शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार' हा खेळाडूंसाठी मानाचा समजला जातो. त्याच धर्तीवर सर्व जिल्ह्यांतील 'गुणवंत क्रीडा पुरस्कार' हा 'छत्रपती संभाजीराजे क्रीडा पुरस्कार' म्हणून सन्मानित करावा, अशी मागणी महेश गिरडकर यांनी केली आहे.

# पाथरी येथे जागतिक महिला दिना निमित्त कर्तबगार महिलांचा सत्कार

**पाथरी । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून परभणी जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने गाथा सन्मानाची या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भावनाताई नखाते होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून ऐश्वर्या लाहोटी, परभणी जिल्हा महिला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उपाध्यक्षा मंगल सुरवसे, पाथरी महिला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या शहराध्यक्षा रेणुका सावळे, सुनिता राखुंडे आदी उपस्थित होत्या.परभणी जिल्ह्यात विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या महिलांचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रशासकीय अधिकारी अंजली कुलकर्णी, डॉक्टर सारिका कुलकर्णी, वकील जयश्री भदर्गे, शिक्षिका डॉ. विजया दाढेल, साहित्यिक मायाताई वांगीकर, महिला वाहनचालक आशा शंकर फड, अंगणवाडी सेविका सुंदरताई आत्माराम मगर, आशा सेविका मीनाक्षी नामदेवराव धोतरे, होमगार्ड अरुणा कदम, स्वच्छता कर्मचारी नम्रताताई हातागळे, आदर्श माता मीराताई गिराम आणि डाटा ऑपरेटर सुमन सुरवसे यांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमात बोलताना प्रमुख पाहुण्या ऐश्वर्या लाहोटी यांनी महिलांनी समाजाच्या प्रगतीमध्ये अग्रभागी राहावे असे मत व्यक्त केले. डॉ. विजया दाढेल यांनी महिलांच्या प्रगतीमध्ये शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करत उच्च शिक्षणाचा आग्रह धरला. कवयत्री मायाताई वांगीकर यांनी स्त्रीवादी कविता सादर केली. महिला वाहनचालक आशा फड यांनी महिलांनी जीवनातील आव्हाने स्वीकारण्याची तयारी ठेवावी, असा संदेश दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना घटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कमल कांबळे यांनी मानले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.



## विद्या विकास हायस्कूल व जुनीयर कॉलेज येथे जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न

**हिंगणघाट । प्रतिनिधी**




दिनांक ०८ मार्च २०२५ रोज शनिवार ला सकाळी ९.०० वाजता विद्या विकास हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज हिंगणघाट येथे जागतिक महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला अध्यक्ष व प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. जया निलेश तुळसकर संचालिका विद्या विकास शिक्षण संस्था हिंगणघाट तसेच विद्या विकास हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज हिंगणघाट चे मुख्याध्यापक नितेश रोडे, शाळेच्या जेष्ठ शिक्षिका लता गोल्हर व प्रमुख अतिथी लीला वैद्य उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दिप प्रज्वलनाने झाली. कार्यक्रमाच्या औचित्याने समजातील कर्तुत्ववान स्त्रियांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. जया निलेश तुळसकर यांचा सन्मानचिन्ह व वृक्ष भेट देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचा उद्देश लता गोल्हर यांनी आपल्या प्रस्ताविकातून मांडण्याचा प्रयत्न केला. परिस्थितीनुरूप पूर्वीची स्त्री व सध्याची स्त्री यातील झालेला बदल वैद्य यांनी आपल्या मनोगतातून स्पष्ट केला. मुख्याध्यापक नितेश रोडे यांनी विविध उदाहरणामधून सध्याची स्त्री कशी प्रगल्भ झाली व प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाने स्त्री शक्तीचा ठसा उमटवित आहे यावर भाष्य केले. तर अध्यक्षीय मनोगतातून प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. जया निलेश तुळसकर यांनी ज्या दिवशी स्त्रीला समाजातील प्रत्येक घटकामध्ये मानसन्मान, समान अधिकार व पूर्ण स्वातंत्र्य मिळेल त्या दिवशी खर्या अर्थाने स्त्री शक्तीच्या सन्मानाकरिता खरा महिला दिन साजरा करू. असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी वेशभुषेच्या माध्यमातून विविध स्त्री शक्तीची रुपे सादर करून संपूर्ण स्त्रीशक्तीला मनाचा मुजरा अर्पण केला. सोबतच विद्यार्थ्यांनी गीत, स्वरचित काव्य व भाषणांनाच्या माध्यमातून नारी शक्तीच्या कर्तुत्ववार प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुवर्णा तेलंग यांनी तर आभार प्रदर्शन सुवर्णा पर्बत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता कोळसे, मानकर, सिडामे, टिपले, पुसदेकर, नाल्हे, खांदनकर व सोनाली राऊत यांनी सहकार्य केले.

## पुलगावच्या आर.के.ज्ञान मंदिरममध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजरा




**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील आर.के. ज्ञान मंदिरम इंग्रजी माध्यम शाळेत आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचे प्राचार्य नितीन श्रीवास, पर्यवेक्षिका प्रीती बिडकर व प्रणिता कोंबे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा विशेष कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वतीच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य नितीन श्रीवास होते, तर विशेष अतिथी म्हणून पर्यवेक्षिका प्रीती बिडकर व प्रणिता कोंबे उपस्थित होत्या. याप्रसंगी सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना गुलाब पुष्प व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.प्राचार्य नितीन श्रीवास आणि पर्यवेक्षिका प्रीती बिडकर यांनी महिला दिनाचे महत्त्व, महिलांचे समाजातील योगदान आणि त्यांची भूमिका यावर प्रकाश टाकला. तसेच त्यांनी स्त्रीशक्तीवर आधारित एक सुंदर कविता सादर केली.या कार्यक्रमात शिक्षिकांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले, ज्याचा सर्वांनी आनंद घेतला. कार्यक्रमाचे सुयोग्य संचालन इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी श्रेया दुबे, तनुश्री पार्धेकर व समृद्धी वैद्य यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रावणी वाघ हिने मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजन समिती, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्राचार्य नितीन श्रीवास यांच्या मार्गदर्शनाखाली अथक परिश्रम घेतले.

## महिलादिनी शासकीय योजनांचा लाभ जनतेच्या दारी-वढोलीतील उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**




तालुक्यातील वढोली येथे जागतिक महिला दिनानिमित्त तहसील कार्यालयाच्या पुढाकारातून विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. शनिवार, ८ मार्च रोजी पार पडलेल्या या उपक्रमात नवीन रेशनकार्ड, जात प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र, भोगवट हक्क प्रकरणे, उत्पन्न दाखले, फेरफार प्रक्रिया आणि शासकीय योजनांचे अर्ज भरून घेण्यात आले.

या शिबिरात संजय गांधी योजना, श्रावणबाळ निराधार योजना यांसह विविध सरकारी योजनांचे लाभ ग्रामस्थांना तत्काळ उपलब्ध करून देण्यात आले. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घेतला आणि समाधान व्यक्त केले.कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी अपूर्वा बासुर, तहसीलदार शुभम बहाकर, मंडळ अधिकारी सुकेसनी कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या आयोजन करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार चांदेकर, तलाठी अश्विनी शेळके, महसूल सहाय्यक महेंद्र चिवंडे, महसूल सेवक जितेंद्र लोडे, कृषी सहाय्यक रेशमा गुजर, पोलीस पाटील मंदा आत्राम यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी आणि गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या उपक्रमामुळे नागरिकांचे प्रश्न गावातच सुटल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले आणि अशा प्रकारच्या शिबिरांचे नियमित आयोजन करण्याची मागणी केली.

## रावगाव येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन उत्साहात साजर




**सोलापूर । प्रतिनिधी**

रावगाव (ता. करमाळा) येथे प्रेरणा मानव विकास प्रतिष्ठानच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले आणि अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमांचे पूजन जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षिका रोहिणी चव्हाण-बरडे यांच्या हस्ते करण्यात आले.


यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामदास कांबळे यांनी महिलांच्या समाजातील महत्त्वाच्या योगदानावर प्रकाश टाकत महिलांना पुरुषांसारखे समान अधिकार मिळावेत, यासाठी महिला दिन साजरा केला जातो, असे सांगितले.कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्या प्रियंका कांबळे, प्रतिष्ठानच्या सचिव शितल कांबळे, रोहिणी चव्हाण-बरडे, विद्या गंभीर-शिंदे, कोमल काळुंखे, पल्लवी पवार, द्रौपदी जाधव, दिपाली कांबळे, शोभा पवार यांच्यासह अनेक महिला आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## भंडाराची लेक विश्वात एक!

**भंडारा । हंसराज भंडारा**

भंडारा जिल्ह्यातील खमारी बुट्टी येथील प्राची दुर्गा केशव चटप हिने आट्यापाट्या विश्वचषकात भारतीय महिला संघाचे नेतृत्व करत सुवर्णपदक पटकावले. तिच्या यशाने देशाचे नाव जागतिक स्तरावर उज्ज्वल केले असून, ग्रामीण भागातील मुलींना क्रीडा क्षेत्रात संधी देण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

प्राचीचा प्रवास संघर्षमय होता. लहानपणीच वडील गमावल्याने आई दुर्गा चटप यांनी मोलमजुरी करून कुटुंबाला उभे केले. प्रतिकूल परिस्थितीतही प्राचीने जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले. भुतानमध्ये झालेल्या दक्षिण आशियाई स्पर्धेत ती भारतीय संघाची कर्णधार होती.समाजातील पारंपरिक विचारसरणीमुळे मुलींना खेळात अडथळे येतात. मात्र, कुटुंबाचा पाठिंबा, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर प्राचीने हे सिद्ध केले की संधी दिल्यास मुली कोणत्याही क्षेत्रात चमकू शकतात.महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी शाळा, महाविद्यालये आणि शासनाने विशेष योजना राबवाव्यात. प्राचीच्या यशाने नव्या पिढीतील




खेळाडूंना प्रेरणा मिळेल आणि खेळात मुलींचा सहभाग वाढेल. 'भंडाराची लेक विश्वात एक' हा फक्त घोष नाही, तर संपूर्ण समाजासाठी जागरूकतेचा संदेश आहे!

## सातारा जिल्हा रुग्णालयात सुरक्षारक्षक दारूच्या नशेत; गुन्हा दाखल

**सातारा । प्रतिनिधी**

जिल्हा शासकीय रुग्णालयात सुरक्षारक्षक विश्वनाथ विनायक घुमरे (रा. देशमुख कॉलनी, सातारा) हा दारूच्या नशेत सापडल्याची घटना समोर आली आहे. डॉ. तेजस पठाडे यांनी याबाबत सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.४ मार्च रोजी वैद्यकीय पथक रुग्णालयाच्या सुरक्षेची पाहणी करत असताना घुमरे हा विश्रामगृहात मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत आढळला. घटनेनंतर प्रशासनाच्या दुर्लक्षाबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत.या प्रकरणी पोलीस हवालदार देशमुख पुढील तपास करत आहेत.

## सृजन इंग्लिश मिडीयम स्कूल देवळी येथे भव्य विज्ञान प्रदर्शन

**देवळी । प्रतिनिधी**

सृजन इंग्लिश मिडीयम स्कूल, देवळी येथे आंतरराष्ट्रीय विज्ञान दिवसानिमित्त विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला चालना मिळावी व विज्ञान विषयाची अभिरुची निर्माण व्हावी या उद्देशाने हे प्रदर्शन घेण्यात आले. या प्रदर्शनामध्ये माध्यमिक वर्गाच्या विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला.

प्रदर्शनाचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा डॉ. श्रद्धा चोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. प्रशांत चव्हाण, मुख्याध्यापिका प्रिया वैद्य, हायस्कूल विभाग प्रमुख कीर्ती कामडी, विज्ञान शिक्षिका कल्याणी वंजारी यांनी मॉडेलचे परीक्षण करून सर्वोत्तम मॉडेलला पुरस्कार प्रदान केला.कार्यक्रमाला उपमुख्याध्यापिका पल्लवी काळे, सरला कापसे, निधी जानवे, सुनीता वाडकर, मोटघरे, भोयर, गावंडे, सूरज डाखरे, स्नेहा लाडेकर, जगताप, काठोके, शेंडे, वरघने, पाठक, ओझा, बुरांडे, कात्रे तसेच सृजन इंग्लिश मिडीयम स्कूलचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.सर्वोत्तम मॉडेलला अध्यक्षा आणि सचिव यांच्या हस्ते पुरस्कार देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



## ऊस वाहतूकदार व शेतकऱ्यांचा मेळावा उद्या मिरगव्हान येथे

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील मिरगव्हान येथे महाराष्ट्र राज्य ऊस वाहतूकदार शेतकरी संघटनेच्या वतीने भव्य मेळावा आयोजित करण्यात आला आहे. रविवार, ९ मार्च रोजी संध्याकाळी ७ वाजता होणाऱ्या या मेळाव्यात संघटनेचे अध्यक्ष राजू पाटील आणि शेतकरी कामगार संघर्ष समितीचे संस्थापक दशरथ अण्णा कांबळे मार्गदर्शन करणार आहेत.

ऊस वाहतूकदारांवर होत असलेल्या अन्याय, फसवणूक, कर्जवसुलीचा त्रास, जबरदस्तीने वाहन जप्ती, फसवणुकीसाठी १३८ आणि ४२० कलमांत गुन्हे दाखल करण्याचा प्रकार याविरोधात संघटित लढ्याचा निर्धार करण्यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.साखर कारखानदार, ऊस तोडी मुकादम आणि सरकारच्या उदासीन धोरणांविरोधात लढा उभारण्यासाठी सर्व ऊस वाहतूकदार आणि शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## चिखली येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**मोहोळ । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चिखली (ता. मोहोळ) येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक विष्णू दाढे यांच्या मार्गदर्शनाखाली व शिक्षिका मालन चेंडगे आणि अर्चना घुगे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबवण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले, तसेच विजेत्यांना संसारोपयोगी साहित्य भेट देण्यात आले. विद्यार्थिनींनी नृत्य सादर केले, तर महिलांनी आपले मनोगत व्यक्त केले.



कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना घुगे यांनी केले, तर मालन चेंडगे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. महिला दिनाचे महत्त्व अधोरेखित करत उपस्थितांनी कार्यक्रमाचा आनंद घेतला.

## गोळवाडी येथे जागतिक महिला दिन साजरा

**वैजापूर**-संपूर्ण तालुक्यात विविध ठिकाणी जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. श्रीक्षेत्र गोळवाडी येथे सुरू असलेल्या श्रीमद् भागवत कथेमध्येही विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून महिला दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीसूर्य सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजा करण्यात आली. यावेळी नम्रता माधव रोठे यांनी मी स्वतः सावित्रीबाई फुले बोलते असे म्हणून महिलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.सरपंच भाऊसाहेब पाटील शिंदे यांनी महिलांचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, महिला शिवाय कोणतेही कार्य शक्य नाही. मुलांना चांगले संस्कार आणि शिक्षण देण्याचे कार्य महिलाच करू शकतात.कार्यक्रमाला भाऊसाहेब पाटील शिंदे (सरपंच), वाल्मीक पगार, बाबासाहेब शिंदे, किरण पगार, भगवान शिंदे, नानाभाऊ शिंदे, थोरात मामा, मांजरे आप्पा, बाळू आबा पगार, पांडुरंग महाराज पवार यांसह गावातील महिला, मुली आणि तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एस.पी.नूरुल हसन यांना 'फिक्की स्मार्ट पोलिसिंग पुरस्कार'

**भंडारा । प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस अधीक्षक नूरुल हसन यांना 'फिक्की स्मार्ट पोलिसिंग पुरस्कार २०२४' प्रदान करण्यात आला. वर्धा येथे कार्यरत असताना त्यांनी राबविलेल्या 'ई दरबार' या उपक्रमासाठी त्यांना हा सन्मान मिळाला.

'ई दरबार' ही ऑनलाईन प्रणाली असून, यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांना थेट वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधता येतो. यामुळे पोलीस ठाण्यांतील कर्मचाऱ्यांना एस.पी. कार्यालयात येण्याची गरज भासत नाही आणि त्यांच्या तक्रारी तत्काळ सोडवल्या जातात.या संकल्पनेमुळे पोलीसांचे मनोबल वाढण्यास मदत होत असून, वेळ आणि




पैशाचीही बचत होते. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

# आंजीत ग्रामीण रुग्णालय उभारणार आरोग्य सुविधांचा मोठा विस्तार



**वर्धा । प्रतिनिधी**

वाढत्या अपघातांची संख्या आणि तातडीच्या आरोग्य सुविधांचा अभाव लक्षात घेऊन आंजी मोठी येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे वर्धा, आर्वी, देवळी आणि कारंजा तालुक्यातील ८० गावांना आरोग्य सुविधांचा थेट लाभ मिळणार आहे. भाजपाचे जिल्हाध्यक्ष सुनिल गफाट यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हा प्रकल्प मंजुरीस पात्र ठरला आहे.

आंजी मोठी हे वर्धा-आर्वी-कारंजा राष्ट्रीय महामार्गावरील महत्त्वाचे गाव असून, परिसरातील अनेक गावांसाठी ते आरोग्यसेवेचे केंद्र ठरणार आहे. यापूर्वी रुग्णांना उपचारांसाठी वर्धा किंवा आर्वी येथे जावे लागत होते. वेळेत वाहन न मिळाल्याने अनेक रुग्ण दगावल्याच्या घटना घडल्या आहेत. महामार्गावरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर येथे तातडीच्या वैद्यकीय सुविधांची गरज होती.सुनिल गफाट यांनी २०१६ मध्ये प्रथमच ग्रामीण रुग्णालयाची मागणी केली. तत्कालीन विधान परिषद सदस्य अनिल सोले यांच्या सहकार्याने शासनस्तरावर पाठपुरावा सुरू झाला. २०१७ मध्ये आरोग्य विभागाने प्रस्ताव मांडला, मात्र तांत्रिक त्रुटींमुळे तो मंजूर होऊ शकला नाही.२०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंजी दौऱ्यात रुग्णालय मंजुरीचे आश्वासन दिले आणि त्यानुसार मान्यता मिळाली. मात्र, राजकीय सत्तांतरामुळे प्रकल्प रखडला. भाजपाचे सरकार परत आल्यावर सुनिल गफाट यांनी पुन्हा पाठपुरावा करून अखेर मंजुरी मिळवली. आ. राजेश बकाणे आणि पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या सहकार्यामुळे हा प्रकल्प प्रत्यक्षात येत आहे.या रुग्णालयासाठी २६ कोटी १ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. रुग्णालयात तळमजला आणि पहिला मजला अशा दोन स्तरांवर सुविधा असतील. एकूण ४८४६.९६ चौ.मी. क्षेत्रफळाच्या या रुग्णालयात सीसीटीव्ही, अग्निसुरक्षा, वातानुकूलित यंत्रणा, लिफ्ट, संरक्षण भिंत, पाणीपुरवठा व मलनिस्सारण यांसारख्या अत्याधुनिक सुविधा असतील.ग्रामीण रुग्णालय मंजूर केल्याबद्दल सुनिल गफाट यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, माजी खासदार रामदास तडस, माजी आमदार अनिल सोले आणि आ. राजेश बकाणे यांचे आभार मानले आहेत. या निर्णयामुळे संपूर्ण परिसरातील नागरिकांना तातडीच्या आणि दर्जेदार आरोग्यसेवेचा मोठा फायदा होणार आहे.

## जागतिक महिला दिनानिमित्त टाकळी ग्रामपंचायतीचा अभिनव उपक्रम

**कोपरगाव । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त टाकळी ग्रामपंचायतीने विशेष महिला ग्रामसभा आयोजित करून महिलांना एक दिवसासाठी सरपंच आणि उपसरपंचपदाची संधी दिली. सरपंच संदीप देवकर यांच्या संकल्पनेतून कल्पना लक्ष्मण मालकर यांना महिला सरपंच, तर भारती बाळासाहेब देवकर यांना महिला उपसरपंच म्हणून जबाबदारी देण्यात आली. एक दिवसीय महिला सरपंच आणि उपसरपंच यांचा सत्कार अनुक्रमे संदीप देवकर आणि माजी सभापती सुनील देवकर यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी गावातील विजया नंदू आमले यांचा 'आदर्श महिला' म्हणून सन्मान करण्यात आला.




कार्यक्रमास कोपरगाव पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी शबाना शेख यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाला ग्रामपंचायत उपसरपंच संजय देवकर, सदस्य शशिकांत देवकर, रूपाली मालकर, हिराबाई मोरे, ग्रामसेवक भाऊसाहेब गुंड, मुख्याध्यापिका कांता देवकर, पोलीस पाटील राजेंद्र देवकर, आरोग्य सेविका, अंगणवाडी सेविका, आशा सेविका आणि ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

## आत्मविश्वासाने महिला कर्तृत्व सिद्ध करते-स्नेहलताताई कोल्हे

**कोपरगाव । प्रतिनिधी**

महिलांचा विविध क्षेत्रातील सहभाग दिवसेंदिवस वाढत असून, धाडस आणि आत्मविश्वासाच्या जोरावर महिला विश्व सांभाळत आहेत, असे मत माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांनी व्यक्त केले.सद्गुरू गंगागिर महाराज महाविद्यालय व संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त 'महिला कल्याण व सशक्तीकरण' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यावेळी गोदावरी नदीत युवकांचे प्राण वाचविल्याबद्दल ताराबाई पवार आणि 'सारेगम लिटिल चॅम्प्स' विजेती गायिका गौरी पगारे यांचा सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमात विधिज्ञ पूनम गुजराथी यांनी महिलांसाठी असलेल्या कायद्यांबाबत मार्गदर्शन, पोलीस निरीक्षक भगवान मथुरे यांनी स्वसंरक्षण आणि महिलांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना, तर डॉ. मंजुषा गायकवाड यांनी महिलांच्या आरोग्यविषयक जागरूकतेवर भर दिला.यावेळी भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा वैशाली आढाव, विद्याताई सोनवणे, दीपाताई गिरमे, शिल्पाताई रोहमारे, किरनभाभी दगडे, सुवर्णाताई सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

## निकृष्ट रस्त्याच्या कामाच्या चौकशीसाठी आमरण उपोषण सुरू

**माळशिरस । प्रतिनिधी**

माळशिरस तालुक्यातील रा.मा. १४५ ते महाळुंग-श्रीपूर सेक्शन १५ ते नेवरे (प्रा.जी.मा.क्र. ११८) या अंदाजे ८ ते १४ कि.मी. रस्त्याच्या सुधारणा कामाच्या निकृष्ट दर्जाविरोधात सार्वजनिक बांधकाम विभाग, अकलूज कार्यालयासमोर आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात आली आहे.

परिसरातील ग्रामस्थांच्या तक्रारीनंतर घटनास्थळी चौकशी करण्यात आली असता काम अतिशय बोगस आणि निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनास आले. सार्वजनिक बांधकाम विभागाने नियुक्त अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषी आढळल्यास त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी आणि




ठेकेदाराला काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी करण्यात आली आहे.यासंदर्भात आंतरराष्ट्रीय मानवाधिकार सुरक्षा संघटनेचे मा. रणजितदादा गायकवाड यांनी आठ दिवसांत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

## मुद्देश वाडगाव ग्रामपंचायतीच्या वतीने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**गंगापूर । प्रतिनिधी**

मुद्देश वाडगाव ग्रामपंचायतीच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त गावातील कर्तबगार महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अंगणवाडी सेविका, जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका, आरोग्य सेविका यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

महिला दिनानिमित्त गावातील चिमुकल्यांनी विविध कर्तबगार महिलांच्या वेशभूषेचे साकार करून उत्साहात सहभाग घेतला.कार्यक्रमाला लोकनियुक्त सरपंच योगेश तारु, उपसरपंच भागवत दारुंटे,



ग्रामपंचायत सदस्य भारती दारुंटे, मुक्ताबाई गादेकर, ग्रामपंचायत कर्मचारी आशाबाई पठाण, शिक्षक कबाडे, साळुंखे , वावरे, तोडमाल , व्हाईस चेअरमन इनुस भाई शेख यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## विद्या विकास पब्लिक स्कूलमध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**बाभळेश्वर । प्रतिनिधी**

कै. श्री. नाथाजी पाटील म्हस्के शैक्षणिक संस्थेच्या विद्या विकास पब्लिक स्कूल आणि नाथाजी पाटील म्हस्के ज्युनिअर कॉलेजच्या वतीने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन फार्मस फर्टिलायझर को-ऑपरेटिव्ह लिमिटेडच्या संचालिका सौ. कमलताई रावसाहेब म्हस्के या उपस्थित होत्या. आपल्या भाषणात राणी लक्ष्मीबाई, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले आणि सरोजिनी नायडू यांचे कार्य उल्लेखनीय असल्याचे सांगून महिलांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घेत कुटुंब आणि समाजाच्या प्रगतीत मोलाचे योगदान




दिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात महिला शिक्षिकांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून उत्साह वाढवला. यावेळी राधिका म्हस्के, मनीषा लहामगे, नंदा नन्नावरे, शीतल विखे, माधुरी निर्मळ, अर्चना नळे, मीनाताई म्हस्के, आर्शिया पटेल, पुनम म्हस्के, रेश्मा जायभाये, शीतल म्हस्के, मीनाक्षी देसरडा, राजश्री म्हस्के, वैष्णवी म्हस्के, जानवी गोसावी, सोनाली बनसोडे, सोनल पटेल, लतिका म्हस्के, अश्विनी गोरे यांसह महिला पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वाती चेचरे, तर आभार प्रदर्शन अमृता सोमवंशी यांनी केले.

## योजनांच्या सर्वेक्षण व अन्वेषणात नवीन तंत्रज्ञानाचा वापर-ना.राधाकृष्ण विखे पाटील

**लोणी । प्रतिनिधी**

जलसंपदा विभागाच्या योजनांचे सर्वेक्षण व अन्वेषण कार्य गतीने करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे, अशी माहिती जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासावेळी दिली.

गुगुळ प्रवाही वळण योजनेद्वारे मांजरपाडा धरणातून गोदावरी खोऱ्यात पाणी वळवले जाणार असून, योजनेचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. तसेच ३० प्रवाही वळण योजनांपैकी १४ योजनांची कामे पूर्ण झाली असून, १.०८ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळवले जात आहे.८



योजना बांधकामाधीन असून २.०९ टीएमसी पाणी वळवले जाणार आहे, तर ८ योजना प्रस्तावित आहेत, ज्याद्वारे ४.२३ टीएमसी पाणी वळवण्याचे नियोजन आहे.पार-तापी-नर्मदा प्रकल्प रद्द झाल्याने उपलब्ध पाणी पार-गोदावरी योजनेसाठी अधिकाधिक वापरण्यासाठी तलांकनिहाय मर्यादा न ठेवता सविस्तर अभ्यास करून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत, असेही मंत्री विखे-पाटील यांनी स्पष्ट केले.

## माणसं जोडण्यासाठी पाच पूल बांधले, तोडण्याची भाषा कधी केली नाही-ना.राधाकृष्ण विखे पाटील

**लोणी । प्रतिनिधी**

आश्वी आणि परिसरात आम्ही माणसं जोडण्यासाठी पाच पूल बांधले, तोडण्याची भाषा कधी केली नाही. अप्पर तहसील कार्यालय हे जनतेच्या सुविधेसाठी आहे, तालुक्यातील जनतेने परिवर्तन केले आहे, आता त्यांचे स्वातंत्र्य हिरावू नका, असा टोला जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांना नाव न घेता लगावला.

आश्वी बुद्रूक येथे प्रवरा मेडिकल ट्रस्टच्या आरोग्य केंद्राच्या उद्घाटनप्रसंगी मंत्री विखे पाटील बोलत होते. अप्पर तहसील कार्यालयासंदर्भात महसूल विभागाने हरकती मागविल्या असून,



महसूल मंडळांची रचना झाल्यानंतर हे कार्यालय स्थापन होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.तोडण्याची भाषा करणाऱ्यांनी आता शांत बसावे विधानसभा निवडणुकीत तालुक्यात परिवर्तन झाले असून, जनतेला यशोधनातून मुक्तता हवी होती, त्यामुळेच अमोल खताळांसारखा सामान्य तरुण आमदार म्हणून निवडून आला.आम्ही जोडण्याचे काम करतो, तोडण्याचे नाही. अप्पर तहसील कार्यालयाच्या चर्चेनंतर काहींना स्वातंत्र्याची लढाई आठवली. आता जनतेने निर्णय घेतला आहे, त्यांना त्यांचे काम करू द्या.तुमच्या कारकीर्दीत वाळू आणि क्रशर माफियांना वैभव प्राप्त झाले, मात्र महायुती हे कायम जनतेच्या पाठीशी राहील, असा विश्वासही मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला.

## मतिमंद महिलेवर बलात्कार करून फरार झालेला आरोपी अद्याप पोलिसांच्या हाती नाही

**पिशोर । प्रतिनिधी**

कन्नड तालुक्यातील घाटशेंद्रा येथे ७९ वर्षीय नजीर वजीर सय्यद या वृद्धाने ३९ वर्षीय मतिमंद महिलेवर बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली असून, आरोपी आठ दिवसांपासून फरार आहे.

पीडिता आपल्या सावत्र भावासोबत राहत होती. २७ फेब्रुवारी रोजी पिशोर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी गेल्या तीन महिन्यांपासून पीडितेच्या घराच्या वरच्या मजल्यावरील खोलीत भाड्याने राहत होता.पीडितेच्या सावत्र मावशीने हा प्रकार पाहिल्याने हा गुन्हा समोर आला. तिच्या चौकशीत पीडितेने यापूर्वीही आरोपीने बलात्कार केल्याचे सांगितले.पोलिस उपनिरीक्षक रतन डोईफोडे तपास करत असून, आरोपी जमातमध्ये गेल्याची माहिती आहे. मोबाईल लोकेशन ट्रॅक करण्याचा प्रयत्न सुरू असला तरी तो बंद असल्याने आरोपीचा ठावठिकाणा अद्याप लागलेला नाही. लवकरच त्याला अटक करण्यात येईल, असे पोलिसांनी सांगितले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .